तत्त्वज्ञानातील संशोधनाचे तंत्र व क्षेत्र

अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद
फेब्रुवारी 2020

तत्त्वज्ञानातील संशोधनाचे तंत्र व क्षेत्र

: संपादक :
प्रा. वर्षा जपे
डॉ. सुरेन्द्र गायधने
डॉ. सुनील साळुंके

- तत्त्वज्ञानातील संशोधनाचे तंत्र व क्षेत्र
  :प्रा.वर्षा जपे (मुख्य संपादक)
- प्रथमावृत्ती :फेब्रुवारी 08, 2020

© अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद

- प्रकाशक :व्यंकटराव मोरे,
  मु.पो. याकतपूर ता.औसा
  जि.लातूर
  मो.9850740367 / 8329351614
- मुद्रणस्थळ :रुद्रायणी ऑफसेट,औरंगाबाद
- अक्षरजुळणी :डॉ.संगीता मोरे
- पृष्ठ संख्या :196
- मूल्य :रु.200
- **ISBN :978-93-84810-49-8**

अनुक्रमणिका

1. Research As A Tool of Empowerment -
-Dr.Murlidhar Kurhade ...007

2.A Tract on Sophodosy : Modes and Models of Contemplation
-Dr. S. E. Bhelke ...024

3. Current trends in research in philosophy
-Vijay Srinath Kanchi ...055

4. Research Techniques and Areas in Philosophy: An Overview
-Ms.Dhanshree Patrikar ...077

5. प्रबंध लिहिताना.... -डॉ.सुरेन्द्र गायधने ...080

6. संशोधन व विश्वकोशनोंद लेखन : प्रयोजन, प्रक्रिया व फलश्रुत
-डॉ. शर्मिला जयंत वीरकर ...089

7.भारतीय तत्वज्ञानाच्या संशोधन क्षेत्राचा विकास आणि विकासाची परिणती यांचे चिकित्सक परिक्षण -सौ. वर्षा नितिन जपे ...094

8.संशोधनाचा आराखडा -डॉ. सुनिलदत्त एस. गवरे ...102

9.भारतीय तत्त्वज्ञानातील संशोधनाच्या प्राचीन पद्धती
–डॉ. वेदप्रकाश डोणगावकार ...107

10.संशोधन : एक निरंतर चालणारी प्रक्रिया
-डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र ...112

11.तत्वज्ञानातील संशोधन तंत्र आणि क्षेत्र -प्रिती नंदकिशोर धुर्वे ...118

12.संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण हे एक महत्वाचे तंत्र
–बांगर परमेश्वर शिवाजी ...124

13.'व्यक्तिची तदेवता' समस्ये संबंधी संशोधनाची आवश्यकता
– मोनालिसा अ. खानोरकर ...129

14. धार्मिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तुलनात्मक संशोधनपद्धतीची उपयोगिता -चंद्रकांत प्रल्हाद सोनवणे ...135

15.संशोधनाचा एक परिणाम म्हणून तत्त्वचिंतनाचे बदलते प्रवाह
-निखील अरुण पाखोडे ...140

9.भारतीय तत्त्वज्ञानातील संशोधनाच्या प्राचीन पद्धती

डॉ. वेदप्रकाश डोणगावकार
एम. एस. गोटे, महाविद्यालय, वाशिम

संशोधन हा एक महत्वाचा विषय आहे. प्रामुख्याने संशोधनाचा मुख्य उद्देश हा यथार्थ ज्ञान प्राप्त करणे हाच असतो. पण भारतीय ज्ञानमीमांसेच्या अनुषंगाने विचार केला असता आपल्या हे ही लक्षात येते की, यथार्थ ज्ञानाचे विश्लेषण करणे, त्याज्ञानासंदर्भात नवीन पुरावे देणे, त्याची एक विशिष्ट पद्धतीने मांडणी करणे हे देखील संशोधनाचे उदिष्टये आहेत. आणि याची पुष्टी आपल्याला सूत्र ग्रंथ व त्यावरील भाष्य ग्रंथातून येते. किबहुना भारतीय तत्त्वज्ञानात आद्य शंकराचार्य यांनी यावर सर्वाधिक कार्य केले असल्याचेही आपल्या निदर्शनास येते. पण मूळ प्रश्न हा आहे की, यथार्थ ज्ञानापर्यंत कसे पोहचावे ? त्याची काही विशिष्ट पद्धत आहे काय ? निश्चितच याचे उत्तर आपल्याला भारतीय तत्त्वज्ञानातील विविध दर्शनांच्या अभ्यासातून मिळते.

यथार्थ ज्ञानापर्यंत कसे पोहचावे ? या अनुषंगाने भारतीय तत्त्वज्ञानाच्या अध्ययनातून चिंतनाणे, आत्मज्ञानाणे, तत्त्वज्ञानाणे, सत्याच्याज्ञानाणे असे उत्तर देता येते. पण या आत्मज्ञानाची, तत्त्वज्ञानाची किंबहुना सत्यज्ञानाची काही पद्धत आहे का ? असाही प्रश्न पडतो. तर त्याच्या उत्तरात आपल्याला असे म्हणता येईल की, जिज्ञासा, अनुभूति या यथार्थ ज्ञानासाठीच्या मूळ पद्धती आहेत. आणि आशा या मुळ पद्धतीपर्यंत पोहचण्यासाठी संवाद, प्रश्नोत्तर, व्याख्यान, खंडण–मंडण, विश्लेषण या सारख्या इतर काही साधन पद्धती देखील आहेत. तेव्हा याठिकाणी या साधन पद्धतीचा थोडक्यात आढावा घेता येईल.

प्रश्नोत्तर व संवाद पद्धत :

मुण्डकोपनिषदामध्ये 1.1.3 या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे, "शैनक

नावाच्या एक गृहस्थाने अंगिरा नावाच्या ऋषी जवळ जावून असा प्रश्न विचारला की, भगवान ! कशाला जाणल्यानंतर सर्व काही जाणले जाते ?'' असा प्रश्न विचारला आहे. विशेष म्हणजे 1.1.4 पासून पुढील काही श्रुतींमध्ये त्यावर उत्तर ही देण्यात आले आहे. मुण्डकोपनिषदाप्रमाणे इतरही काही उपनिषदांमध्ये अशाच प्रकारचे प्रश्न आणि त्यावर उत्तर देण्यात आले आहेत. यावरुन आपल्या लक्षात येईल की, भारतीय तत्त्वज्ञानात सत्यापर्यंत पोहचण्याची एक रीत म्हणून प्रश्नोत्तर पद्धती ही प्राचिन आहे. आणि यापेक्षाही महत्वाचा विषय हा आहे की, अंतिम सत्याप्राती (ज्याला आपण व्यावहारीक भाषेत मूळ सत्य असे म्हणू) मानवी मनात जिज्ञासा आहे, ज्याचा प्रत्यय भारतीय तत्त्वज्ञानात उपनिषदांच्या माध्यमातून येतो.

प्रामुख्याने भारतीय परंपरेत शिष्य हा आपल्या गुरूला प्रश्न विचारीत असतो. पण बृहदारण्यकोपनिषदामध्ये 2.4.1 ते 2.4.5 या ठिकाणी एक पत्नी आपल्या आचार्य असलेल्या पतिला प्रश्न विचारते आणि तो आचार्य असलेला पतीही त्या पत्नीचे उत्तर देऊन समाधान करतो. त्याचा आशय असा की, याज्ञवल्क्य जेव्हा सन्यास घेण्याचा संकल्प करतो तेव्हा तो मैत्रेयी आणि कात्यायनी या दोन पत्नीमध्ये आपल्याकडे असलेल्या द्रव्याची वाटणी करण्याचा विचार ठेवतो. त्यावर मैत्रेयी त्याला म्हणते की, ''ज्याला घेऊन मी अमर होऊ शकत नाही, त्याला घेऊन मी काय करु ? तेव्हा अमृत तत्त्वाचे जे साधन आहे ते मला सांगा.'' अर्थात प्रश्नोत्तराच्या पद्धतीत 'गुरू आणि शिष्य' असाच संबंध असतो, असे नाही. तर 'ज्ञाता आणि जिज्ञासू' असाच तो संबंध असतो. हे यावरुन स्पष्ट होते.

पण या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, संवाद आणि प्रश्नोत्तराची ही पद्धत केवळ वैदिक परंपरेतच होती असे नाही. कारण या संवाद आणि प्रश्नोत्तर पद्धतीचा प्रत्यय बौद्ध साहित्यातूनही येतो. 'त्रिपीटक' हे बौद्ध साहित्याचे मूळ ग्रंथ आहे. प्रामुख्याने या त्रिपीटकां मध्ये 'बुद्ध आणि भिक्षु' यांच्यातील संवाद संपादित झालेले आहेत.

व्याख्यानाची पद्धत :

संशोधनामध्ये व्याख्यान पद्धतीचे एक विशेष महत्व आहे. व्याख्यानाच्या माध्यमातून संशोधन कर्त्याला तज्ञ वा जाणकार व्यक्तीचे विषयाप्रती असलेले विविध दृष्टिकोन ऐकावयास मिळतात. या शिवाय व्याख्यानकर्त्याचे

त्या विषयाप्रती स्वतःतेचे काय मत आहे ? त्याची मांडणी कशी करावयाची असते ? याचाही दष्टांतही श्रोत्याला येतो. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने उपनिषदात आणि बौद्ध साहित्यात ही व्याख्यानाची पद्धत दिसून येते. सुत्तपिटकातील दीघनिकायात प्रतित्य समुत्पादाविषयी बुद्ध आणि आनंद, वर्ण व्यवस्थेविषी बुद्ध आणि वशिष्ट यांच्या संवादातून बुद्धांचे व्याख्यान महत्वाचे आहेत. याशिवाय संयुक्तनिकायात बुद्ध आणि आयुष्मान कात्यायन, बुद्ध आणि आयुष्मान राहुल यांचा, तर मज्झिमनिकायात बुद्ध आणि वत्सगोत्र, बुद्ध आणि सारिपुत्र, बुद्ध आणि महाप्रजापती गौतमी यांच्यातील विविध विषयाला अनुसरुन झालेले संवाद आणि त्यावर बुद्धांचे व्याख्यान अत्यंत महत्वाची व प्रसिद्ध आहेत.

एकंदर संवाद आणि त्यातून व्याख्यानाच्या माध्यमातून होणारा उपदेश हा देखील संशोधनासाठी उपयुक्त ठरणारा घटक आहे. करण अशा या पद्धतीतून सत्याचे प्रतिपादन करतांना दष्टांत वा उदाहारण देण्याकरीता एक मोठी जागा मिळते. किंबहुना श्रोत्याला विषयाच्या अनेक पैलूंना एकण्याची संधी मिळते. ज्याची मूळे भारतीय प्राचिन तत्त्वज्ञानात आहेत.

खंडन–मंडनाची पद्धत :

भारतीय तत्त्वज्ञानात खंडण मंडणाची पद्धती प्रसिद्ध आहे. अशा या पद्धतीतून विषयाचे यथार्थ स्वरूप सांगण्यासाठी बळ मिळते. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने अशी ही खंडण–मंडणाची पद्धत पूर्वमीमांसा सूत्रात पाहावयास मिळते. या सूत्र ग्रंथाची रचना ही प्रामुख्याने 'पूर्वपक्ष – उत्तरपक्ष – आणि सिद्धांतपक्ष' या स्वरूपात झाली आहे. म्हणजेच एखाद्या विषयासंदर्भाच चर्चा करीत असतांना पूर्वपक्षाचे काय मत आहे ? हे मांडून त्यला उत्तर म्हणून सूत्रकारांनी उत्तरपक्षाची मांडणी केलेली आहे. याशिवाय काही ठिकाणी पूर्वपक्षाच्या मतावर उत्तर देत सूत्रकारांनी सिद्धांतपक्ष मांडूण आपले अंतीम निष्कर्षही मांडलेले आहेत. अर्थात या वरुन हे लक्षात येते की, यथार्थज्ञानासाठी पुर्वमतांचा आढावा घेत त्यासंदर्भात नवीन दाखले देण्याची आणि त्यावर आपला निष्कर्ष मांडण्याची संशोधनातली ही रीत भारतीय तत्त्वज्ञानात प्राचिन काळीच मांडण्यात आलेली होती.

विश्लेषण पद्धत :

विश्लेषणचा सर्व सामान्य अर्थ विषयाच्या विविध अंगांचा अभ्यास करणे असा होते. ज्यात विषयाचे अकलन होण्यासाठी त्याचे भाग करणे, त्याचे प्रकार पाडणे या सर्व क्रिया अंतर्भुत असतात. भारतीय तत्त्वज्ञानात विश्लेषणाच्या या पद्धतीचाही अवलंब झालेला दिसूण येतो. प्रामुख्याने न्यायसूत्र, वैशेषिक सूत्र, तत्त्वार्थसूत्र, पदार्थ द्रव्य संग्रह या ग्रंथामध्ये ज्या पद्धतीने विषयाची माडणी झालेली आहे त्यावरुन विश्लेषणाची पद्धत कशी असू शकते याचा प्रत्यय येतो.

समारोप :

अशा प्राकारे तत्त्वज्ञान हा एक व्यापक अभ्यास विषय आहे. प्रामुख्याने या विषयात विश्लेषण पद्धतीला अधिक महत्त्व दिले जाते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भाने सांगावयाचे झाल्यास तत्त्वज्ञानाची मूळ पद्धत ही चिंतन, अनुभूति आहे. पण उपनिषद, बौद्ध (त्रिपिटक) आणि जैन (समयसार) साहित्याचा अभ्यास केला असता हे लक्षात येते की, भारतीय तत्त्वज्ञानात संवाद आणि संवादाच्या माध्यमातून प्रश्नोत्तर, आणि त्यातूनच व्याख्यान वा उपदेशाची पद्धतीला ही महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने सूत्र ग्रंथातून खंडन–मंडनाच्या पद्धतीचा आवलंब केला गेला आहे. निश्चितच अशा या प्राचिन पद्धतीचा आधुनिक संशोधनावर प्रभाव पडला असावा. कारण त्यातूनच आधुनिक काळात संशय, विश्लेषण, विरोध–विकास पद्धतीलाही तत्त्वाज्ञानात अभ्यासाची किंबहुना संशोधनाची पद्धत म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु वास्तविक पाहता संशय पद्धत ही चिंतनातून, विश्लेषणाची पद्धता ही व्याख्यान वा उपदेशातून तर विरोध–विकासाची पद्धत ही खंडण–मंडणातून विकास पावते. विरोध–विकास पद्धतीची एक बाजू म्हणजे वाद–प्रतिवाद होय. तत्त्व–नीतिच्या आधारे होणाऱ्या वाद–प्रतिवादातून जे नवीन निष्कर्श, तथ्य वा उपाय समारे येतात ते एका अर्थाने नवीन तत्त्वज्ञान असते आणि याचा प्रत्यय देखील आपल्याला भारतीय तत्त्वज्ञानातून (वैशेषिकांची आत्म संकल्पना, किंवा पूर्वमीमांसासूत्र) येतो.

एकंदर भारतीय भारतीय तत्त्वज्ञानातील संशोधनाची पद्धत ही

प्राचिन आहे. व तीचा प्रभाव इतर संशोधनाच्या पद्धतीवर पडलेला जाणवते.

संदर्भ सूची :

१.मुण्डकोपनिषद – गीताप्रेस, गोरखपूर

२.बृहदारण्यकोपनिषद – गीताप्रेस, गोरखपूर

३.दीघ निकाय (सुत्त पिटक) – अनु. राहुल सांकृत्यायन, जगदीश काश्यप, महाबोधि सभा, सारनाथ

४.मज्झिम निकाय (सुत्त पिटक) – अनु. राहुल सांकृत्यायन,महाबोधि सभा, सारनाथ

५.संयुत्त निकाय –1 (सुत्त पिटक) – अनु. जगदीश काश्यप, धर्मरक्षित, महाबोधि सभा, सारनाथ

६.मिलिन्द प्रश्न – अनु. जगदीश काश्यप, स्थविर भिक्षु उ.कित्तिमा, बर्मी धर्मशाला, सारनाथ

७.सांख्य दर्शन (सांख्यसूत्र व सांख्यकारीका) – अनु. डॉ. उदय कुमठेकर, प्रसाद प्रकाशन, पूणे

८. सांख्यकारिकाः – ईश्वरकृष्ण –(गौडपादभाष्यानुवाद सह) – अनु. जगन्नथशास्त्री, मोतीलाल बनारसीदास, पूणे

९.वैशेषिक दर्शन (वैशेषिकसूत्र व पदार्थ धर्मसंग्रह) – अनु. डॉ. उदय कुमठेकर, प्रसाद प्रकाशन, पूणे

१०.पूर्वमीमांसा दर्शन (मीमांसासूत्र) – अनु. डॉ. उदय कुमठेकर, प्रसाद प्रकाशन, पूणे

११.भारतीय ज्ञानमीमांसा – डॉ. वेदप्रकाश डेणगावकर, स्वाती प्रकाशन, पूर्णा

●●●